19 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डीकेटीई महाविद्यालय संशोधन केंद्र बनावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्ञानसंस्कार वृद्धीसाठी शिष्यवृत्ती हे प्रोत्साहनाचे महत्त्वाचे माध्यम आहे. या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये विद्यार्थ्यांना सहकार्य, प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश आहे. आगामी काळात डीकेटीई महाविद्यालयातील संशोधनात्मक कार्य पाहून 'रिसर्च परफॉर्मिंग कॉलेज' म्हणून त्याचा गौरव करण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि डीकेटीईचे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने डीकेटीईच्या ऐतिहासिक दरबार हॉलमध्ये शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ (शैक्षणिक वर्ष २०१६–१७) गटनिहाय गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे डीकेटीई इचलकरंजीत झालेल्या शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात शिष्यवृत्तीप्राप्त प्राचार्यांच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे. सोबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. सपना आवाडे, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य.**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, गेली १९ वर्षे शिवाजी विद्यापीठाने विद्यापीठातील जे विद्यार्थी अभ्यासक्रमामध्ये पहिल्या, दुसऱ्या व अंतिम वर्षाच्या परीक्षांमध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येतात त्यांच्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरू केली आहे. अधिकाधिक गुणवत्ताधारक विद्यार्थी तयार व्हावेत, हा यामागे हेतू आहे. या योजनेंतर्गत शहरी, निमशहरी व ग्रामीण गटातून सर्वाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता शिष्यवृत्ती संपादन केलेली आहे, अशा महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यामागे गुणवत्ता वर्धित करण्याचा मुख्य हेतू आहे.

संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे यांनी डीकेटीईची स्थापना व वस्त्रोद्योगाच्या प्रगतीचा इतिहास सांगितला. या कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, शिक्षण शास्त्र व विधि विद्याशाखांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. डीकेटीईचे संचालक प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संस्थेचे डायरेक्टर प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, डीकेटीईचे प्रशासकीय उपसंचालक प्रा. डॉ. यू. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा. डॉ. एल. एस. आडमुठे यांनी स्वीकारला.

यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, घाळी कॉलेजचे प्राचार्य एम. आर. पाटील, तासगाव कॉलेजचे प्राचार्य आर. आर. कुंभार, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. होणगेकर, एएससी कॉलेज, पलूसचे प्राचार्य डॉ. बी. एन. पवार आदी उपस्थित होते. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे महेश काकडे, डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे, प्रा. एस. जी. कानिटकर आदी उपस्थित होते.

19 JUN 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानसंस्कारवृद्धीसाठी शिष्यवृत्ती प्रोत्साहनाचे माध्यम

## देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठाचा गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ 'डीकेटीई'मध्ये उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्ञानसंस्कार वृद्धीसाठी शिष्यवृत्ती हे प्रोत्साहनाचे महत्त्वाचे माध्यम आहे. या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश आहे; तसेच येत्या काळात महाविद्यालयातील संशोधनात्मक कार्य पाहून 'रिसर्च परफॉर्मिंग कॉलेज' म्हणून महाविद्यालयांचा गौरव करण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. इचलकरंजी येथील डीकेटीई महाविद्यालयात झालेल्या शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठ आणि 'डीकेटीई'चे टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट यांच्या वतीने 'डीकेटीई'च्या दरबार हॉलमध्ये शनिवारी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभ (शैक्षणिक वर्ष २०१६-१७) गटनिहाय गुणवत्ताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार समारंभ झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे प्रमुख उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डीकेटीई, इचलकरंजी येथे झालेल्या शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभात शिष्यवृत्ती प्राप्त महाविद्यालयातील प्राचार्यांच्या सत्कारप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद बी. शिंदे, 'डीकेटीई'चे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, शिवाजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, सचिव डॉ. सपना आवाडे यांच्यासमवेत उपस्थित महाविद्यालयांचे प्राचार्य.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, गेली १९ वर्षे शिवाजी विद्यापीठाने विद्यापीठातील जे विद्यार्थी अभ्यासक्रमामध्ये पहिल्या, दुसऱ्या व अंतिम वर्षाच्या परीक्षांमध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येतात, त्यांच्यासाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत शहरी, निमशहरी व ग्रामीण गटांतून सर्वाधिक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता शिष्यवृत्ती संपादन केलेली आहे, अशा महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यामागे गुणवत्ता वर्धित करण्याचा मुख्य हेतू आहे. या कार्यक्रमात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र व विधी विद्याशाखांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. 'डीकेटीई'चे संचालक प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. 'डीकेटीई'चे प्रशासकीय उपसंचालक डॉ. यू. जे. पाटील, शैक्षणिक उपसंचालक डॉ. एल. एस. आडमुठे, शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, घाळी कॉलेजचे प्राचार्य एम. आर. पाटील, तासगाव कॉलेजचे प्राचार्य आर. आर. कुंभार, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. होणगेकर, एएससी कॉलेज, पलूसचे प्राचार्य डॉ. बी. एन. पवार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. यू. जे. पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, 'डीकेटीई'च्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे यांच्यासह विभागप्रमुख व शिक्षक उपस्थित होते. प्रा. एस. जी. कानिटकर यांनी सूत्रसंचालन केले.

19 JUN 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आत्मविश्वास वाढविण्यासाठी शिष्यवृत्तीची योजना : कुलगुरू

## 'डीकेटीई'चा गुणवत्ताप्राप्त महाविद्यालय पुरस्काराने गौरव

इचलकरंजी, ता. १८ : 'ज्ञान संस्कारातील प्रोत्साहनाला शिष्यवृत्ती हे माध्यम आहे व या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश आहे,' असे उद्‌गार कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे यांनी काढले. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१६-२०१७ मध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिटयूटने अभियांत्रिकी विद्या शाखेतून निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल कुलगुरू शिंदे यांच्या हस्ते डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिटयूटचा गुणवत्ताप्राप्त महाविद्यालय म्हणून सत्कार झाला. हा सत्कार संस्थेचे डायरेक्टर प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, डेप्युटी डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन प्रा. डॉ. यु. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा. डॉ. सौ. एल. एस. आडमुठे यांनी स्वीकारला.




**इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठातर्फे प्राचार्य डॉ. कडोले व सहकाऱ्यांचा सत्कार करताना कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे, डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, एम. ए. काकडे, डॉ. सपना आवाडे.**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डीकेटीईचे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिटयूट यांच्या संयुक्त विद्यमाने डीकेटीईच्या दरबार हॉल येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभाप्रसंगी अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. शिंदे होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2017

पुढारी




इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डीकेटीईचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले. शेजारी डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, एम. ए. काकडे, सचिव डॉ. सपना आवाडे आदी.

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत डीकेटीई इंजिनिअरिंग कॉलेज प्रथम

**इचलकरंजी : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१६-१७ मध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटने अभियांत्रिकी विद्या शाखांमधून निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.देवानंद शिंदे यांच्या हस्ते डीकेटीईचा गौरव करण्यात आला.

प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले, डेप्युटी डायरेक्टर ॲडमिनिस्ट्रेशन प्रा. डॉ. यू. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा. डॉ. सौ.एल. एस. आडमुठे यांनी हा पुरस्कार डॉ. शिंदे यांच्या हस्ते स्वीकारला.

ज्ञान संस्कारातील प्रोत्साहनाला शिष्यवृत्ती हे माध्यम आहे व या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढविणे हा उद्देश असल्याचे उद्‌गार यावेळी डॉ. शिंदे यांनी काढले. त्यानंतर डॉ. कडोले यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक एम. ए. काकडे, डीकेटीईच्या मानद सचिव डॉ. सौ. सपना आवाडे, विभागप्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. एस. जी.कानिटकर यांनी सूत्रसंचालन केले.

1 9 JUN 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे 'डीकेटीईचा' गौरव

**इचलकरंजी / प्रतिनिधी :** डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँड इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूटने अभियांत्रिकी विद्याशाखेतून निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँड इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूटचा गुणवत्ताप्राप्त महाविद्यालय म्हणून गौरव करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डीकेटीईचे टेक्स्टाईल अँड इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमाने डीकेटीईच्या दरबार हॉल येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी संस्थेचे डायरेक्टर प्रा. डॉ.




**इचलकरंजी : येथील गुणगौरव समारंभात प्राचार्य पी. व्ही. कडोले यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कल्लाप्पाण्णा आवाडे आदी.**

पी. व्ही. कडोले, डेप्युटी डायरेक्टर अॅडमिनिस्ट्रेशन प्रा. डॉ. जु. जे. पाटील, डेप्युटी डायरेक्टर शैक्षणिक प्रा.डॉ. एल. एस. आडमुळे यांनी हा सत्कार स्वीकारला.

ज्ञान संस्कारातील प्रोत्साहनाला शिष्यवृत्ती हे माध्यम आहे. या शिष्यवृत्ती योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहकार्य व प्रेरित करणे आणि आत्मविश्वास वाढवणे हा उद्देश असल्याने डॉ. शिंदे यांनी सांगितले. त्यामुळे या कार्याची दखल घेऊन डीकेटीईचा गौरव करण्यात आल्याचे सांगितले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे संचालक एम. ए. काकडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, विभागप्रमुख, प्राध्यापक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एस. जी. कानिटकर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठाचे ऑनलाइन बुक स्टोअर

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'कुलगुरूपदाच्या कारकीर्दीस दोन वर्षे पूर्ण होत असतानाच विद्यापीठाच्या स्वतंत्र ऑनलाइन बुक स्टोअरचे लोकार्पण करीत असताना होणारा आनंद अवर्णनीय आहे', अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली. विद्यापीठाच्या प्रकाशने विभागाच्यावतीने तयार केलेल्या 'एसयुके ई- स्टोअर'चे तसेच 'एम्प्लॉईज कॉर्नर'च्या विस्तारित सेवेचे आज कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाच्या प्रकाशने विभागातर्फे अनेक दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन होते. हा माहितीचा, ज्ञानाचा खजिना वाचकांसाठी खुला करण्याचे स्वप्न बाळगले होते. त्यानुसार, विद्यापीठाच्या स्वतंत्र ई-बुक स्टोअरचे दालन वाचकांसाठी खुले करताना आनंद होत आहे. ग्राहक कोणत्याही डिजिटल, कॅशलेस पद्धतीने ही पुस्तके खरेदी करू शकणार आहेत.'

प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी 'एसयुके ई-स्टोअर'वरून पहिले पुस्तक खरेदी करून ते कुलगुरू डॉ. शिंदे यांना प्रदान केले. मीडियाटेक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश शिंदे यांनी एसयुके ई-स्टोअरविषयी सादरीकरण केले. सोमवारपासून याची लिंक विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. पी. एन. भोसले आदी उपस्थित होते.

1 9 JUN 2017

**लोकमत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या ऑनलाइन बुक स्टोअरचे उद्घाटन

## कुलगुरुंच्या द्विवर्षपूर्तीनिमित्त 'एम्प्लॉईज कॉर्नर' सेवेचाही विस्तार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कुलगुरु पदाच्या कारकिर्दीस दोन वर्षे पूर्ण होत असतानाच विद्यापीठाच्या स्वतंत्र ऑनलाइन बुक स्टोअरचे उद्घाटन तथा लोकार्पण करीत असताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारकिर्दीस शनिवारी दोन वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त राजर्षी शाहू सभागृहात शिवाजी विद्यापीठाच्या प्रकाशने विभागाच्या वतीने तयार केलेल्या 'एसयूके ई-स्टोअर'चे तसेच 'एम्प्लॉईज कॉर्नर'च्या विस्तारित सेवेचे कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या प्रकाशने विभागातर्फे आजपर्यंत अनेक दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन केले आहे. काही पुस्तकांना देशातूनच नव्हे, तर परदेशांतूनही मागणी आहे. मात्र, ही पुस्तके केवळ प्रकाशने विभागातच उपलब्ध होती. हा माहितीचा, ज्ञानाचा खजिना वाचकांसाठी खुला करण्याचे स्वप्न मी बाळगले होते. त्यानुसार, आज विद्यापीठाच्या स्वतंत्र ई-बुक स्टोअरचे दालन वाचकांसाठी खुले करीत असताना अत्यंत आनंद होतो आहे. यावेळी विद्यापीठाचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी 'एसयूके ई-स्टोअर'वरुन पहिले पुस्तक खरेदी करुन ते कुलगुरु डॉ. शिंदे यांना प्रदान केले.

कार्यक्रमास प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. पी. एन. भोसले यांच्यासह विद्यापीठाचे सर्व अधिष्ठाता, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाइन बुक स्टोअरवरुन पहिले पुस्तक खरेदी करुन ते कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना प्रदान करताना प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले. सोबत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा, मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे उपस्थित होते.

### ग्राहक कॅशलेशने पुस्तके खरेदी करु शकतात

सध्या अधिक मागणी असणारी पुस्तके या व्यासपीठावर उपलब्ध केली असली, तरी टप्प्याटप्प्याने अन्य पुस्तकेही या व्यासपीठावरुन खरेदीसाठी उपलब्ध केली जातील. ग्राहक कोणत्याही डिजिटल अथवा कॅशलेस पद्धतीने ही पुस्तके खरेदी करु शकणार आहेत, असेही कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

19 JUN 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात निवडणुकांची मोर्चेबांधणी सुरू

## उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने प्रसिध्द केली विद्याशाखांच्या निवडणुकांची नियमावली

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

राज्यातील उच्चशिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल करणारे 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक' विधानसभेत एक वर्षापूर्वी मंजूर झाले. त्याची अंमलबजावणी १ मार्चपासून झाल्यामुळे अधिकार मंडळांच्या पदनियुक्त्या आणि महाविद्यालयातील निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. महाविद्यालय व विद्यापीठ विद्यार्थी मंडळांच्या निवडणुकांचे 'परिनियम' विद्यापीठाला प्राप्त झाले नसले तरी पदवीधरांची नवनोंदणी प्रवेशावेळीच सुरू केली आहे. येत्या काही दिवसात विद्यार्थ्यांच्या निवडणुकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे. मात्र सध्या निवडणुका कशा घ्यायच्या याची अंतर्गत तयारी विद्यापीठाने जोरात सुरू केली आहे. तर विद्यार्थी संघटनांनी विद्यार्थी निवडणुकांची मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विविध अधिकार मंडळ व विद्यार्थी परिषदांवर निवडून येण्यासाठी नियम व अटी प्रसिध्द केल्या आहेत. महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारच्या निवडणुका होणार आहेत. विधीमंडळाच्या संयुक्त समितीने केलेल्या ५६ शिफारशी स्वीकारून नवीन विद्यापीठ कायदा अंमलात आला आहे. अभ्यासक्रमाची गुणवत्ता सुधारण्यासाठी उद्योगाचा सहभाग अशा महत्वाच्या तरतुदी कायद्यात केल्या आहेत. प्राधीकरणाचा सदस्य म्हणून निवडून जाण्यासाठी प्रत्येक पदाला वेगवेगळी पात्रता दिली आहे. प्राचार्य, संलग्न महाविद्यालय, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, नोंदणीकृत पदवीधर आदी गटांनी निवडून दिलेल्या सदस्यांची नियुक्ती प्राधीकरणाचा सदस्य म्हणून करण्यात येणार आहे.

२०१७–१८ या शैक्षणिक वर्षातील सर्व परिषदांसाठीचे परिनियम विद्यापीठांना प्राप्त झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ निवडणुकांची युध्द पातळीवर तयारी सुरू आहे. विद्यार्थी संघटनांनी प्राथमिक पातळीवर बैठका सुरू केल्या असून योग्य उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. यावर्षीच्या निवडणुकांसाठी विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार असल्यामुळे यावर्षाच्या निवडणुकांना वेगळीच रंगत येणार आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तर संजय घोडावत इन्स्टिट्यूटमध्ये कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम २७ नुसार कुलपतींच्या मान्यतेने प्राधीकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीची पात्रता प्रसिध्द केली आहे. यामध्ये प्राचार्य, प्राध्यापक, विद्यापीठ अध्यापक, नोंदणीकृत पदवीधर (कलम २), व्यवस्थापन परिषद (कलम ३०), विद्यापरिषद (कलम ३२) , अभ्यास मंडळ (कलम ४०), अधिसभा (कलम २८), विद्याशाखा (कलम ३४), विद्यापीठ विभाग आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासमंडळ (कलम ४२), महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळ (कलम ४४), आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ (कलम ४५), परीक्षा व मूल्यमापन मंडळ (कलम ४७), माहिती तंत्रज्ञान मंडळ (कलम ४९), राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ (कलम ५१), नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ (कलम ५३), विद्यार्थी विकास मंडळ (कलम ५५), क्रिडा व शारीरिक शिक्षण मंडळ (कलम ५०), संशोधन मंडळ (कलम ५९) या १५ मुख्य पदांच्या नियुक्त्या संबंधीत कलमातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहेत.

### निवडणूक प्रक्रिया सुरू

विद्यापीठ निवडणुका घेण्याची तयारी विद्यापीठ प्रशासनाने सुरू केली आहे. यामध्ये विद्यापीठ कायदा सर्वांनाच समजावा म्हणून विद्यापीठातर्फे चर्चासत्रे, कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. विद्यापीठ प्रशासनाने नियोजनाच्या बैठका घेण्यास सुरूवात केली आहे. तसेच ३१ ऑगस्टपर्यंत निवडणुका पूर्ण करून ३१ नोव्हेंबरपर्यंत सर्व अधिकार मंडळावर पदनियुक्त्या केल्या जाणार आहेत. सध्या पदवीधरांची नावनोंदणी सुरू केली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नावनोंदणी करावी.

–डॉ. विलास नांदवडेकर (कुलसचिव)



### अभाविप आणि भाजप युवा मोर्चा एकत्र

विद्यापीठ निवडणुकांमध्ये अखिल भारतीय विद्यार्थी संघटना आणि भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा एकत्र येऊन निवडणूक लढवणार आहे. अभाविपच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीला उभा राहण्याची संधी देवून भाजप युवा मोर्चा पाठींबा देणार आहे. विद्यापीठ निवडणुकांमध्येही भाजपचाच झेंडा फडकला पाहिजे. यासाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ निवडणुकांचे नियोजन केले जाईल.

–संदीप देसाई (भाजप जिल्हाध्यक्ष)

### पक्षप्रमुखांच्या आदेशानुसार निवडणुका

• विद्यापीठ निवडणुका कशा लढवायच्या यासंदर्भात पक्षप्रमुख जो आदेश देतील त्याप्रमाणे निवडणुका लढवल्या जाणार आहेत. महाविद्यालय व विद्यापीठ निवडणुकात कोणाशी युती करायची की मित्रपक्षाला बरोबर घेवून निवडणूक लढवायची याचे नियोजन सुरू आहे. विद्यापीठ निवडणुका लढवण्यासाठी नेतृत्वाचा शोध सुरू आहे.

–रोहित पाटील (राष्ट्रवादी कॉंग्रेस युवा संघटना)

### कार्यकर्त्यांना संधी देणाऱ्याबरोबर युती

विद्यापीठ निवडणुकांमध्ये मनसे युवा संघटनेच्या कार्यकर्त्यांना जे संधी देतील त्या संघटनेबरोबर युती करण्याचा विचार आहे. बऱ्याच युवा संघटना आमच्याशी संवाद साधत आहेत. मात्र अजून निर्णय सांगितलेला नाही.

–मंदार पाटील (मनसे युवा संघटना शहराअध्यक्ष)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# किचन गार्डनिंगची नवी बॅच २२ पासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रामार्फत किचन गार्डन प्रशिक्षण सुरु होत आहे. प्रशिक्षण गुरुवार, २२ जून ते ८ ऑक्टोंबरदरम्यान देण्यात येणार आहे. प्रशिक्षणात घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळझाडांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, लॅन्डस्केप, जैविक खते व जंतूनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जातात. कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे करण्यात आले आहे.